# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६/०८/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०९) इतिवृत्त**

**बुधवार** दिनांक **१६ ऑगष्ट २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. श्री. मुजीब आलमशाह खान
5. सौ. दलाल लता श्रीनिवास
6. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
7. श्री. पांडे विनायक प्रभाकर
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. मो. जावेद मो. इसाक
13. श्री. सावंत मधुकर दामोधर
14. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.मुजीब खान : 15-16 महिने झालेले आहेत. प्रभागाचा, शहराचा विकास व्हावा ही भावना ठेऊन प्रशासनाला विकास कामांमध्ये नेहमीच सहयोग करण्यात येतो. परंतु विकास कामे होत नाहीत. शहाबाजार येथील चंपा मस्जीद ते रोशनगेट हा रस्ता तत्कालीन आयुक्त श्री.गौतम साहेब असतांना तयार करण्यात आलेला आहे. या रस्त्यावर अतिक्रमण असल्याबाबत उप आयुक्तांना पत्र दिले. आजही नाल्यावर अतिक्रमण आहे. किराडपुरा, कटकटगेट दरवाजापर्यंत मनपाने बाजूला भिंत केली, तेथे नाला बदलून आजही अतिक्रमण केले जात आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष नाही. घोषीत झोपडपट्टीच्या संदर्भात उप अभियंता(स्लम) व प्रकल्प संचालक यांना अर्ज दिले. मा.आयुक्तांनी देखील पाहणी केलेली आहे. या झोपडपट्टीतील 25-30 घरे एका बाजुला असून शासनाची योजना राबविण्यात येईल असे सांगण्यात आले होते, परंतु आजपर्यंत करण्यात आलेले नाही. आज मा.सभापती, स्थायी समिती यांना दाखविण्यात आले. मकसूद कॉलनी पर्यंत घोषीत झोपडपट्टी आहे. मकसूद कॉलनी ते रविंदनगर नाला अंदाजपत्रक तयार होऊन सहा महिने झाले. संचिका परत येतात. मा.आयुक्तांचे आदेश होऊनही लेखा विभागात संचिका सहा महिने राहिली. झोपडपट्टीच्या संदर्भात पत्र मिळालेले आहे.

मा. सभापती : प्रकल्प संचालक यांनी खुलासा करावा की, ही वसाहत घोषीत झोपडपट्टी मध्ये येते किंवा नाही.

प्र.प्रकल्प संचालक : शहाबाजार झोपडपट्टीच्या संदर्भात मा.विभागीय आयुक्तांचे पत्र दि.7-9-83 नुसार ही वसाहत झोपडपट्टी म्हणून घोषीत झालेली आहे.

मा. आयुक्त : मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी यासह 4 वसाहती झोपडपट्ट्या म्हणून घोषीत झाल्याचे कळविले आहे. ते घोषीत झोपडपट्टी म्हणून गृहीत धरले.

श्री.मुजीब खान : शहाबाजार झोपडपट्टीमधून रस्ता जातो, 30-40 घरे एका बाजूला आहेत व बाकीची दुसऱ्या बाजूला. या झोपडपट्टीचे नकाशे आहेत. प्रकल्प संचालक श्री.जावरे यांना दाखवले.

मा. आयुक्त : काही झोपडपट्ट्या घोषीत झालेल्या आहेत त्यावेळी मा.विभागीय आयुक्त यांचेकडून पत्र मिळालेले आहे. त्यात हद्दी दाखवण्यात आलेल्या नाहीत. ही योजना जर घोषीत झ ाोपडपट्टी नसेल आणि इतर सर्व निकष पूर्ण करीत असेल तर झोपडपट्टी विकासासाठी अनुज्ञेय होते किंवा कसे हे या विभागाचे प्रमुख उप आयुक्त(प्र) यांनी 4-5 दिवसांत खात्री करावी. या योजनेत घोषीत झोपडपट्ट्या येतात की नाही, घोषीत झोपडपट्टीच्या यादीत येत नसेल तरी योजना राबविण्यास हरकत नाही.

मा. सभापती : उप आयुक्त(प्र) यांना सूचना देण्यात येते की, या वसाहतीत ही योजना राबविता येते किंवा नाही हे पहावे.

श्री.साहेबराव कावडे : चिकलठाणा येथील बौध्दवाडा झोपडपट्टीमध्ये मागच्या वर्षी 200 घरकुलांच्या फायली दिल्या. मिळकतपत्रिका तयार आहेत. ते काम होत नाही.

मा. आयुक्त : दोन वर्षापुर्वीची योजना होती, 40 हजार रूपये द्यायचे.ती योजना बंद झाली. त्याऐवजी दुसरी योजना आली. विभागाला सर्वेक्षण करून सादर करण्याच्या सूचना दिल्या. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रथम चार झोपडपट्ट्या निवडल्या, त्यास स्थायी समितीची मान्यता घेऊन सर्व्हे पूर्ण केला. या चारमध्ये राहूलनगर, गांधीनगर, आंबेडकरनगर, ब्रिजवाडी यांचा समावेश आहे.

श्री.साहेबराव कावडे : आमची जुनी वस्ती आहे त्याचा समावेश करावा.

श्री.मधुकर सावंत : सन 2004-05 मध्ये मी पत्र दिले होते, घोषीत झोपडपट्टीमध्ये डॉ.आंबेडकर आवास योजना राबवावी. तत्कालीन महापौर श्री.जैन यांना ही योजना राबविण्याची विनंती केली होती.

मा. आयुक्त : या चार वसाहतीची योजना मंजूर झाल्यानंतर इतर वसाहतींमध्ये योजना राबविण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.

श्री.पुनमचंद बमणे : हर्सूलचा समावेश करावा.

मा. सभापती : एकत्रित सर्व्हे करून कार्यवाही करावी. सध्या चार वसाहतींची कार्यवाही सुरू आहे. शहरातील उर्वरीत घोषीत झोपडपट्ट्या आहेत तेथेही कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे : दारिद्र्य रेषेखालील सर्व्हेच्या संदर्भात प्रकल्प संचालक यांनी खुलासा केला होता, सर्व्हे होऊन आठ महिने झाले. व त्यासही एक-दीड वर्ष झाले. सर्व्हेचे काम पूर्ण झाले. 40-50 हजार लोक दारिद्र्य रेषेखाली राहतात. याद्या तयार करण्याचे काम चालू आहे, मराठीतून इंग्रजीत नांवे लिहिण्यात येतात. या बाबीकडे दुर्लक्ष झालेले आहे. हा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. दारिद्र्य रेषेखालील कार्ड न मिळाल्यामुळे गरीब जनतेला सवलतीच्या दरात रॉकेल, गहू इ. मिळत नाही. या कामासाठी कर्मचारी नसतील तर वाढवून देण्यात यावे.

श्री.विनायक पांडे : वॉर्ड क्र.5, 6 आणि 10 मध्ये 429 लोकांचा दारिद्र्य रेषेखालील सर्व्हे करून देण्यासाठी मी स्वतः मदत केलेली आहे. त्यासही एक वर्ष झाले. कार्ड कधी मिळणार. रॉकेल 30 रूपये लिटर ब्लॅकमध्ये घ्यावे लागते.

उप आयुक्त(प्र) : दारिद्र्य रेषेखालील सर्व्हे संदर्भात स्थायी समितीचा पाठपुरावा होता. सर्व्हेचे काम पूर्ण झाले. 79 हजार मिळकतींचा त्यात समावेश झालेला आहे. याची सविस्तर सीडी तयार करण्यात आलेली आहे. ती मराठीतून तयार करण्यात आली असून मा.जिल्हाधिकारी यांनी ती इंग्रजीतून करण्यास सांगितले. 60 हजार मिळकतींचे काम पूर्ण झाले. 19 हजार बाकी आहेत. 1 तारखेपर्यंत काम पूर्ण करून शासनाकडे पाठविण्यात येईल.

सौ.लता दलाल : भरून द्यावयाच्या अर्जामध्ये अनेक त्रुट्या आहेत. गरजू लोकांपर्यंत कर्मचारी पोहोचले नाहीत. अर्जाचा नमुना बरोबर नाही, त्यामुळे चुकीची माहिती भरण्यात आली. याला कोण जबाबदार आहे. या शहरात 70-80 हजारांपेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली असतील. प्रशासनाच्या चुकीमुळे सर्वांना त्रास होतो. कार्ड नसल्यामुळे रॉकेल, धान्य मिळत नाही. प्रशासनाला गांभीर्य नाही. पुरवठा अधिकारी यांचा सर्व्हे रिपोर्ट नाही म्हणून आलेल्या पत्रास प्रशासनाने पाठपुरावा केला का?

श्री.मुजीब खान : दारिद्र्य रेषेखालील सर्वेक्षणाच्या वेळी नगरसेवकांना माहिती दिली तर ते दारिद्र्य रेषेखालील असलेले व्यक्ती ताबडतोब दाखवून देतील. दारिद्र्य रेषेखालील सर्व्हेच्या यादीमध्ये अनेक कार्यालयातील कर्मचाऱ्यांची नांवे आहेत. मोठमोठ्या लोकांच्या नातेवाईकांची नांवे यादीत आहेत. सदस्यांना यादी दिली तर अशी नांवे समोर येतील.

मा. सभापती : सर्वेक्षण व्यवस्थित झाले आहे का, व हे काम कधी पूर्ण होणार आहे?

मा. आयुक्त : सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. आता फक्त भाषांतराचे काम चालू असून 01 तारखेपर्यंत पूर्ण होईल व जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविले जाईल.

सौ.लता दलाल : प्रकल्प संचालक यांचा अतिरिक्त कार्यभार कोणाला दिलेला आहे?

उप आयुक्त(प्र) : प्रकल्प संचालक श्री.जावरे हे वैद्यकीय रजेवर असून समुदाय संघटक सौ.मोरे या प्रकल्प संचालकाचे काम पाहतात.

सौ.लता दलाल : त्यांच्यावर कशी जबाबदारी टाकता येते? त्या कोणत्या संवर्गात येतात? त्यांची कार्यक्षमता आहे का?

मा. सभापती : हा विभाग महत्वाचा विभाग आहे. सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी.

श्री.त्रिंबक तुपे : गुंठेवारी हा महत्वाचा विषय आहे. हायटेक पध्दतीने सर्व्हे चालू आहे. माझा असा आरोप आहे की, एजन्सीचे लोक प्रभागामध्ये त्यांच्या कार्यालयासाठी खोली भाड्याने घेऊन, 700-800 रूपये पगारावर एखाद्या मुलाला ठेवून काम भागवण्यात येते. माझ्या वॉर्डात सुध्दा मी जागा दिली आहे. तिथे फक्त एक मुलगा बसतो. एजन्सीचे लोक सर्व ठिकाणी पोहचत नाहीत. प्रभाग कार्यालयामध्ये 3 लोक आहेत. एक सुटीवर, दोन लोक अंदाजपत्रके तयार करतात. गुंठेवारीचे चालन कोणी तयार करायचे? एजन्सीशी योग्य संपर्क होत नाही. ज्यांना माहिती आहे अशा लोकांनाच कामे देण्यात यावी. प्रामुख्याने एजन्सीला नागरिकांपर्यंत पोचवायचे काम करावे.

श्री.रविकांत गवळी : एजन्सीला कामासाठी काही कालमर्यादा देण्यात आली आहे का? माझ्या वॉर्डात 1100 घरे, 581 फायली, 289 पैकी वॉर्डात 80 चालन देण्यात आले. 50 लोकांनी पैसे भरले. प्रभाग कार्यालयात 200 फायली पडून आहेत. एजन्सीकडे 250 फायली पडलेल्या आहेत. एका एजन्सीने तीन-चार ठिकाणी सर्व्हे सुरू केला. त्यानंतर 2 महिन्यांपासून पत्ता नाही. त्यांची पुण्याला कामे चालू आहेत. संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता पुण्याला आहे असे समजते. हे लोक निघून गेले तर कोण जबाबदार?

श्री.त्रिंबक तुपे : मागे संचिका सादर करण्यात आल्या होत्या, आता एजन्सीवाले पुन्हा नवीन फायली तयार करून पूर्ण खर्च आकारण्यात येतो. अशांच्या बाबतीत हे थांबविण्यात यावे.

मा. आयुक्त : स्वत:हून पूर्ण करावयाची असेल तर करता येते.

श्री.त्रिंबक तुपे : पुर्वी 4 नकाशे देण्यात येत होते. आता 6 नकाशे मागण्यात येतात.

श्री. रविकांत गवळी : पुर्वी ज्या संचिका दाखल केल्या त्या सापडत नाहीत. एजन्सीवाले परत संचिका तयार करा म्हणतात.

मा. आयुक्त : संचिका सापडत नसेल व अधिकाऱ्यांची चूक असेल तर ती आमची जबाबदारी, परंतु संचिका आहे व ती अपूर्ण आहे तर संबंधीताने त्याची पुर्तता करावी.

श्री.त्रिंबक तुपे : वॉर्ड कार्यालयात कर्मचारी कमी असतील तर या कामासाठी एक कर्मचारी वाढविण्यात यावा.

मा. आयुक्त : अंदाजपत्रके तयार करण्यासाठी मागे खाजगी अभियंताकडून करून घेण्याचा प्रस्ताव मंजूर झालेला नाही.

मा. सभापती : गुंठेवारीचे काम एजन्सी योग्य प्रकारे करताना दिसत नाही. स.नगरसेवकांच्या प्रभागात त्यांनी त्यांच्या लोकांची नेमणूक केल्याचे दिसत नाही. मा.आयुक्तांच्या दालनात सर्व एजन्सीला बोलावून आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात.

श्री.मुजीब खान : गुंठेवारीची कामे कोणकोणत्या भागात येतात त्यांचे नकाशे लावले नाही. अनेकवेळा विचारण्यात आले. नगरसेवकांना माहिती देत नाही व नकाशेही उपलब्ध करून दिले जात नाही. गणेशकॉलनी, आलमगीर कॉलनी हा भाग 45-50 वर्षे जुना असून पूर्ण बांधकाम झालेले आहे. गणेशकॉलनी, आलमगीर कॉलनी, रशीदपुरा हा भाग गुंठेवारीमध्ये दाखविण्यात येतो. परंतु हा भाग गावठाणात येतो. या भागात नवीन घरे होत असतील तर ते गुंठेवारीत घेणे ठिक आहे पण जी वसाहत 40-50 वर्षापुर्वीची आहे त्यास लावू नये. 1988 ला सर्व्हे झाला होता त्यावेळी पाणी पुरवठा विभागने 600 रूपये घेऊन सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. मा.विभागीय आयुक्त कार्यालयाच्या बाजूने त्यांना जलवाहिनी टाकून देण्यात आलेली आहे. गुंठेवारी भागाचे सविस्तर सर्वेक्षण करण्यात यावे. जो भाग गुंठेवारीत येतो त्याचा नकाशा देण्यात यावा.

श्री.जावेद कुरेशी : रशीद कॉलनी, आलमगीर कॉलनी, गणेश कॉलनी हा जुना भाग आहे. मिळकतपत्रिकेवर सारामाफीने नोंद आहे. त्यामुळे या भागात गुंठेवारी नव्हती. या वसाहतीत विकासाची पूर्ण कामे जसे ड्रेनेज, पाणी पुरवठा, विद्युत, रस्ते इत्यादी सर्व कामे झालेली आहेत. मी पत्र देऊन बरेच दिवस झाले त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. 400 वर्षापुर्वीचा रशीदपुरा आहे. 400 वर्षापुर्वीचा खुनी दरवाजा असून त्याची आपण देखभाल दुरूस्ती करू शकलो नाही. परंतु प्रशासनाने ते पाडले. ऐतिहासिक दरवाजे एक-एक करून तोडले. नगरसेवकांना विश्वासात घेतले नाही. स.सदस्या श्रीमती अजरा जबीन यांनी खुनी दरवाजाचे देखभाल दुरूस्तीसाठी कळविलेले आहे. खुनी दरवाजाचे आतील भागात गुंठेवारी नाही, बाहेरील भागात गुंठेवारी आहे.

मा. सभापती : ज्या ज्या वॉर्डात गुंठेवारीने क्षेत्र बाधीत आहेत त्या त्या स.सदस्यांना आठ दिवसात लेखी माहिती द्यावी.

श्री.मुजीब खान : ज्या दरवाजाचा उल्लेख केला जात आहे तो दरवाजा खुनी दरवाजा नसून कुनी दरवाजा आहे.

श्री.साहेबराव कावडे : गुंठेवारीच्या संदर्भात संबंधीत एजन्सी सोबत किती दिवसासाठी करारनामा केला आहे? वेळ संपल्यानंतर उपयोग होणार नाही. पैसे भरायला नागरीक तयार आहेत,

ठेकेदार मात्र सर्व्हे करण्यास तयार नाही. त्यांना फोन केला तर माणूस पाठवतो असे सांगण्यात येते. त्यांचा माणूस केव्हा येतो व केव्हा जातो काही कळत नाही.

मा. आयुक्त : गुंठेवारी भागाचा 100% टोटल स्टेशन सर्व्हे व मार्कींग झालेली आहे. रस्ते व डीपी रस्त्यांची मार्कींग झालेली आहे. ज्या भागाचे ॲलॉटमेंट करण्यात आले त्या भागाचे नकाशे पूर्ण केले. व्यक्तीगत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. 34000 घरांचा सर्व्हे झालेला आहे. 22000 लोकांना रू.751/- भरण्याच्या नोटीसा देण्यात आल्या. 4500 लोकांनी भरणा केलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : जो नकाशा सांगीतला तो पूर्ण करून दिला नाही.

मा. आयुक्त : सिडकोचे अधिसूचीत क्षेत्र दाखवू शकलो नाही. जो भाग ॲलॉट केला त्याचे काम पूर्ण झाले.

श्री.त्रिंबक तुपे : गुंठेवारी अंतर्गत काही ठिकाणी रू.760/- तर काही ठिकाणी रू.700/- च्या पावत्या देण्यात आलेल्या आहेत. ह्या पावत्या महानगरपालिकेच्याच आहेत हे कशावरून?

सहा.संचालक न.र. : रू.751/- घेण्यासाठी पावती देण्यात येते. प्रमाणीत करून दिलेली आहे.

डॉ.आशा बिनवडे : माझ्या प्रभागात गुंठेवारीचा भाग असून न्यू शांतीनिकेतन कॉलनी गुंठेवारी अंतर्गत येते. बेटरमेंट चार्जेस भरल्याच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. अनेक दिवसांपासून पाठपुरावा करण्यात येत आहे की आमचे प्लॉट गुंठेवारी लागू करून चलन द्या, पैसे भरून घ्या. 175 भूखंड आहेत, त्यांचे चेअरमनने व मी स्वतः या संदर्भात बोलले. आवश्यक ती खुली जागा ठेऊन बांधकाम केलेले आहे. 50 बाय 60 चे प्लॉट आहेत, 175 लोक एकत्र येऊन पैसे भरण्यास तयार आहेत. ले-आऊट आपल्याकडून मंजूर नाही. शैक्षणिक झोनचे आरक्षण आहे म्हणून संचिका घेण्यात येत नाही. चार दिवसांपुर्वी पत्र प्राप्त झाले की, आर.असोसिएटस्, चेतना सुपरमार्केट या एजन्सीकडून आपल्या संचिका तयार करून घ्याव्यात. संचिका तयार आहेत. शैक्षणिक झोन मागच्या बॉडीमध्ये वगळण्यात आलेले आहे. एजन्सीने या वसाहतीतील भूखंड मोठे आहे म्हणून व रू.751/- मध्ये संचिका तयार करणे परवडत नाही म्हणून थांबवले. 3000 चौ.मी.साठी 1751/- रूपये मागीतले.

मा. आयुक्त : एजन्सीला सरसकट 20 बाय 30 चे भूखंड गृहीत धरून रू.751/- घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. या 751/- मध्ये 51 रू.टॅक्स, 200 रू. शपथपत्रासाठी, 200रू. खर्च व 300 रू.मेहनताना असे आहे.

डॉ.आशा बिनवडे : 20 बाय 30 मध्ये दोन व्यक्ती असेल तर दोन फायली त्यामुळे संख्या जास्त झालेली आहे.

मा. आयुक्त : एजन्सीमार्फत दाखल करणे ही ऐच्छिक बाब आहे. एजन्सीची गरज नाही. स्वतः देखील दाखल करता येईल. एक दिवस कँप ठेवण्यात येईल. दाखल करून घेण्यासाठी 28 तारखेला कॅम्प ठेवू.

श्री.रविकांत गवळी : 50 वर्षे निरंतर सेवा होत आहे त्यास तसेच सोडून दिले पाहिजे. 1950 ला हर्सूल तलाव बांधण्यात आला. या तलावासाठी अर्थसंकल्पात दरवर्षी एक रूपयाची देखील तरतुद होत नाही. तलाव भरून वाहतो. कालच तलावात तीन लोक बुडाले. अग्निशमन दलाने दोघांना काढले, एकाचा मात्र मृत्यू झाला. स्मृतीवनाची देखभाल होत नाही.

मा. सभापती : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : पुतळ्यांचे रंगकाम व देखभाल दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. पावसामुळे काम करू शकलो नाही. पाऊस उघडल्यानंतर करण्यात येईल.

श्री. रविकांत गवळी : काल तलावात बुडून मुलाचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या आल्या होत्या. सात लोकांना लाईफ जॅकेट होते, आठ कर्मचारी तसेच पाण्यात उतरले.

मा. आयुक्त : 40 लाईफ जॅकेट घेण्यास सांगितले आहे.

सौ.लता दलाल : तत्कालीन पालिका आयुक्त श्री.भोगे साहेब असतांना स्मृतीवन उद्यानाचा विकास करण्यात आला. अनेक स.सदस्यांनी व नागरीकांनी स्मृती म्हणून रू.500/-, 1000/- देणगी दिली व झाडे लावली. स्मृती हवेत विरून गेली, उजाडवन झाले. उद्यान विभागाचे याकडे लक्ष नाही. हर्सूल तलावातील गाळ काढणे, रखवालदार नेमणे, आणीबाणीच्या परिस्थितीसाठी व्यवस्था करणे इ. बाबी केलेल्या नाहीत. आता शहर अभियंता सांगतात की अंदाजपत्रके तयार केली. इतके दिवस का नाही लक्ष दिले?

श्री.रविकांत गवळी : हर्सूल तलाव ही आपली मालमत्ता आहे. आपल्या चुकीने एका मुलाचा बुडून मृत्यू झाला त्यांचे कुटुंबियांस आर्थिक मदत करावी.

मा. सभापती : हर्सूल तलाव व स्मृतीवन संदर्भात सूचना देण्यात येते की, अतिरिक्त शहर अभियंता यांनी स्वतः जाऊन स्थळपाहणी करावी. जी उपाययोजना आवश्यक आहे ती करण्यात यावी. तलावात बुडणारी जी दोन मुले वाचवली त्याबद्दल अग्निशमन दलाचे अभिनंदन. जे पैठण येथे पुरग्रस्तांच्या मदतीसाठी मनपाचे जे पथक गेले त्यांचेही कौतुक आणि अभिनंदन. हर्सूल तलावात ज्या मुलाचा बुडून मृत्यू झाला त्याचे कुटुंबियास रूपये 11 हजारांची तातडीची मदत देण्याबाबत स्थायी समिती निर्णय घेत आहे.

श्री.त्रिंबक तुपे : शहराचे डांबरीकरण करणे व जुने रस्ते ठिक करण्याची कामे झालेली आहेत. दोन-तीन महिन्यापुर्वीच केलेल्या रस्त्यांची दुर्दशा झाली. मा.आयुक्तांनी सांगीतले होते खराब काम झाले तर कारवाई करण्यात येईल. माझ्या वॉर्डात 25 लाख रूपये खर्च करून कामे करण्यात आली. ते रस्ते खराब झाले असून खड्डे पडलेलेआहेत. हे काम चांगले झाले की निकृष्ट दर्जाचे झाले याची चौकशी करण्यात यावी.

श्री.मुजीब खान : चंपा मस्जीदच्या कोपऱ्यावर तातडीने अंदाजपत्रक तयार करून फुटपाथ व रस्त्याचे काम झाले. त्या भागात एक टपरी आहे. दि.26-7-2006 ला अतिक्रमण काढण्यासाठी पत्र दिले, टपरी हटविली नाही. कार्यवाही झाली नाही. माझ्यासमक्ष अधिकाऱ्यांना आदेश दिले होते एक तासात काढावे. आजपर्यंत काढले नाही. चंपा मस्जीद ते रोशनगेटपर्यंत ज्या लोकांना जागेचा मोबदला दिला तेथे पुन्हा अतिक्रमण झाले ते काढावे.

श्री.संजय शिरसाट : स्थायी समिती सभेमध्ये सर्व शहराच्या विकासाचा समावेश असावा. वॉर्डाचा विषय जर फारच गंभीर असेल तर घेण्यात यावा.

श्री.मुजीब खान : पूर्ण शहरामध्ये मोठमोठी अतिक्रमणे काढण्याकडे दुर्लक्ष होत आहे. उप आयुक्तांना सांगितल्यानंतरही काढण्यात आले नाही. मुख्य रस्त्यावर इमारती होतात. प्रशासनाचे लक्ष जात नाही का?

मा. सभापती : उप आयुक्त (म) यांनी अतिक्रमण आहे की नाही याची तपासणी करावी, असेल तर ताबडतोब कारवाई करावी.

श्री. मुजीब खान : मा.आयुक्तांची मंजूरी होऊन सहा महिने झालेले आहेत. लेखा विभागामध्ये संचिका का राहिली? मकसूद कॉलनी ते रविंद्रनगर नाला या कामाची संचिका होती.

लेखाधिकारी : सदर संचिका लेखा विभागात फेब्रुवारी अखेरीस आली. सन 2006-07 चे अर्थसंकल्पाचे काम चालू होते. नोंद घेतली नाही. सन 2006-07 चे अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर नोंद घेऊन पाठविली.

श्री.मधुकर सावंत : श्री.काल्डा, कोठारी यांनी महानगरपालिकेची खुली जागा आपल्या नांवावर करून घेतली. गेल्या वर्षी तेथे गेलो असता श्री.के.आर.कुलकर्णी व माझ्यावर गुन्हा दाखल केला. नगरसेवक, अधिकारी डायरेक्ट का आले? ले-आऊट करताना जागा मनपास दिली परंतु ले-आऊट मंजूर झाल्यानंतर पुन्हा त्यांनी आपापल्या नांवावर केले. श्री.कोठारी यांनी दोन मजली इमारतीला जीना बांधला. महानगरपालिका काही करत नाही असा त्यांचा समज आहे. खुल्या जागेवरील त्यांनी स्वतःचे नांव लावले ते नांव कमी करून घ्यावे.

मा. सभापती : नियमानुसार नसेल तर निश्चित काढण्यात येईल. या संदर्भात जी कार्यवाही आवश्यक आहे ती करण्यात यावी.

श्री.जावेद कुरेशी : 57 पदे भरण्यासाठी परीक्षा घेण्यात आलेली आहे. त्यातील 4 जागा धरणग्रस्तांसाठी होत्या. आपण धरणग्रस्ताला मुलाखतपत्र का पाठवले नाही? मा.जिल्हाधिकाऱ्यांकडून पत्र आले होते.

सहा.आयुक्त-1 : धरणग्रस्तासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून यादी मागविण्यात आली होती. धरणग्रस्ताची 4 तारखेची यादी 17 तारखेला आवक-जावक विभागात येऊन 19 तारखेला प्राप्त झाली. 20-21 दोनच दिवस राहिले होते. 22-23 ला सुटी होती. संबंधीतांकडून आवश्यक ती 50/-, 25/- रूपये जी परीक्षा फी भरून घेणे गरजेचे होते. दोन दिवसात सदर कार्यवाही करणे शक्य झाले नाही.

श्री.संजय शिरसाट : पद भरण्याची कार्यवाही दीड वर्षापुर्वी सुरू झालेली होती. दीड वर्ष पाठपुरावा करण्यासाठी लागतो का? हे बरोबर नाही. चार लोकांवर अन्याय झाला असा आमचा आक्षेप आहे.

सहा. आयुक्त-1 : दिलेल्या पत्राचा वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. त्यांना असेही कळविण्यात आले होते की, आपणाकडून 12 जून पर्यंत यादी प्राप्त झाली नाही तर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

मा. सभापती : मा. आयुक्तांनी स्वतः लक्ष घालून यात काही दोष असेल तर आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री.त्रिंबक तुपे : सहा.संचालक नगर रचना यांची बदली झालेली आहे. हे पद महत्वाचे व जबाबदारीचे आहे. जोपर्यंत त्यांच्या जागी इतर अधिकारी येत नाही तोपर्यंत त्यांना महानगरपालिकेतून कार्यमुक्त करू नये.

सौ.लता दलाल : जोपर्यंत शासनाकडून त्यांचे जागी इतर अधिकाऱ्याची नेमणूक होत नाही तोपर्यंत त्यांना सोडू नये.

मा. सभापती : सर्व स.सदस्यांच्या भावना विचारात घेता महानगरपालिकेतील सहाय्यक संचालक नगर रचना यांच्या जागी शासनाकडून जोपर्यंत अधिकारी येत नाही तोपर्यंत त्यांना मनपा सेवेतून कार्यमुक्त करू नये.

सौ. लता दलाल : मागच्या अर्थसंकल्पातील रस्त्यांची कामे मे पर्यंत झालेली आहेत. ती अर्धवट असल्याबाबत मी पत्र दिले. शहरात किती डांबरीकरणाची किती लाखाची कामे झालेली आहेत, गतिरोधक तोडले, बसवले ते पोलीस खात्याच्या निर्देशाप्रमाणे आहे का? माझा आरोप आहे की, फुटपाथची जी कामे झाली त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. औरंगपुरा ते मीलकॉर्नर पर्यंत जे काम झाले त्यात अतिक्रमण आहे. तरी फुटपाथ झालेला आहे. अंजली ते खडकेश्वर फुटपाथ नाही. काही ठिकाणी वैयक्तीक संबंध असल्याने तेथे फुटपाथ नाही. 24 मीटर रस्त्यातून ब्लॅक टॉपींग सोडून राहिलेल्या अडीच मीटर भागात फुटपाथ आहे का? रस्त्याच्या कामांचे वर्क रजिष्टर ठेवले आहे

का? जे खड्डे पडलेले आहेत ती कामे कधी होणार, यास कोण जबाबदार आहे? त्यासंबंधी काय कार्यवाही करण्यात येणार आहे.

अति.शहर अभि. : 2005-2006 मध्ये डांबरीकरणाची जी कामे झाली त्याची माहिती पाठविलेली आहे. प्राप्त नसेल तर आज पुन्हा पाठवण्यात येईल. आपण विविध डीपी रोडवर फुटपाथची कामे हाती घेतली. ही कामे सुरू आहेत, पूर्ण झालेली नाही. 1.3 मीटर ते 2.00 मीटर रूंदीसाठी फुटपाथची कामे करण्यात येतात.

मा. सभापती : या संदर्भात सविस्तर माहिती देणे आवश्यक आहे. मागील वर्षी जे रस्ते झाले त्यांची अवस्था व फुटपाथच्या संदर्भातील माहिती पुढच्या सभेत देण्यात यावी.

**विषय क्र.65 :**

दिनांक 26/7/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे (का.प.क्र.7) व (का.प.क्र.8) इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

डॉ.आशा बिनवडे : कार्यक्रम पत्रिका 7 मध्ये पान क्र.2 वर बायोलॉजीस्ट यांचे स्टेटमेंट आहे.नोव्हॉन औषध फवारणी हाय रिस्क भागात केली जाते. पान क्र.3 वर नोव्हॉन भांडार विभागाकडून खरेदी केली जाते. माशांचा व किटकनाशकांचा नाश करण्यासाठी फवारतो. सदर औषध डास निर्मुलनासाठी नाही. हायरिस्क भागात कशासाठी फवारणी केली जाते? अर्बन मलेरीया स्कीम इत्यादी गंभीर विषय आहे. नोव्हान हे डास निर्मुलनासाठी नाही तर मग हाय रिस्क भागात कशासाठी फवारणी करण्यात आली, चुकीच्या पध्दतीने कामे झालेली आहेत हे स्पष्ट झाले आहे. कुठलीही औषधे वापरली. कर्तव्यात कसूर झालेला आहे, त्यांचेवर कोणती कारवाई होणार.

मा. आयुक्त : नोव्हान हे औषध 25 वर्षापासून फवारणी करण्यात येत आहे. हे औषध फवारणीसाठी शिफारस केलेली आहे किंवा नाही हा विषय आहे. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांना सांगितलेले आहे. शासनाकडून मलेरीया विभागास फॅक्स आलेला आहे. त्यात नोव्हान औषधाचा समावेश नाही. शहरी भागासाठी शिफारस नाही. स्लममध्ये करता येईल. त्या ऐवजी दुसऱ्या औषधांचा वापर करता येईल असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी व बायोलॉजीस्ट यांना बोललो होतो. वेगळे औषधी जे शिफारशी केलेल्या आहेत त्या एका भागात प्रायोगीक तत्वावर वापरून बघू. बापुनगर, गांधीनगर भागात चाचणी घेवू, फरक पडला तर पूर्ण शहरात वापरता येईल. अशा सूचना दिल्या आहेत. प्रत्यक्षात त्याचा परिणाम दिसून आला तर त्याचा विचार केला जाईल.

डॉ.आशा बिनवडे : आतापर्यंत जे झाले त्यावर काय कारवाई करणार. हा कृषि विभागाचा विषय आहे.

मा. आयुक्त : शासकीय तक्त्यामध्ये याची शिफारस नाही. आपण मागील 25 वर्षापासून वापरतो. पॉजीटीव्ह, निगेटीव्ह परिणाम पहायला पाहिजे होते. नुकसान झाले किंवा नाही याबाबत तांत्रिकदृष्ट्या बघावे लागेल.

श्री.संजय शिरसाट : आता जर साठा शिल्लक असेल त्याचे काय करणार. तांत्रिकदृष्ट्या परिणामकारक औषध आहे किंवा नाही हे पाहू. नसेल तर वापर थांबवू या.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेमध्ये बाहेरील डॉक्टर येऊ देत नाही.

श्री.मिलींद दाभाडे : झोपडपट्टी भागासाठी का प्रयोग केला. अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर का केला नाही.

डॉ.आशा बिनवडे : बायोलॉजीस्टचे,जीवशास्त्रवेत्ता असे मराठीकरण करावे.

मा. सभापती : मराठीकरण करण्यात यावे.

श्री.साहेबराव कावडे : मागील बैठकीत मी बोललो होतो, पाणी पुरवठा विभागाची जी कामे मंजूर झाली ते सुरू केले नाही.

श्री.संजय शिरसाट : कोहीनूर प्लाझासंबंधी मी प्रश्न विचारला होता. या सभेत उप आयुक्त(म) उत्तर देणार होते.

उप आयुक्त(म) : या प्रकरणाची संचिका उप आयुक्त(म) यांचेकडे प्राप्त झाली नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही करता आली नाही.

श्री.संजय शिरसाट :उप आयुक्त (म), नगर रचना विभागाकडून संचिका मागतात का उपलब्ध होत नाही.

सहा.संचालक न.र. : सदरची संचिका 2002 मध्ये पार्कींगची मोहीम सुरू केली त्यावेळेसही ती उपलब्ध होऊ शकली नाही. आताही उपलब्ध नाही, म्हणून देऊ शकलो नाही.

श्री.संजय शिरसाट : नेमकी हीच संचिका का मिळत नाही?

मा.आयुक्त : आपल्याकडे फाईल नसेल तर ती पुन्हा तयार करण्यात यावी. आठ दिवसात पुन्हा संचिका तयार करावी. ज्यांच्यामुळे संचिका गहाळ झाली असेल त्याची जबाबदारी निश्चित करावी लागेल. पुढच्या स्थायी समिती सभेपर्यंत प्रयत्न करावे. एक तर फाईल शोधून काढा किंवा नवीन संचिका तयार करावी.

श्री.पुनमचंद बमणे : मागच्या बैठकीत हर्सूल नदीच्या पात्रात 100-150 घरे झालेली आहेत. प्रशासनास पत्र दिले, काय कार्यवाही केली.

उप आयुक्त (म) : शहराच्या बाजुला नदी पात्रात 150 लोकांना नोटीसेस दिल्या. पुनर्वसनचा प्रस्ताव होता. त्या व्यतिरिक्त इतर घरे आहेत. निष्काषीत करण्याची कारवाई पावसाळ्यात करता येत नाही.

श्री.संजय शिरसाट : मा.मुख्यमंत्री यांनी गोदावरी नदीच्या पात्रातील घरे काढण्यासंबंधी सूचना केल्या. कोणते काढता येते कोणते नाही, खुलासा करावा.

श्री.हिंमतराव दाभाडे : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना आणि औरंगाबाद महानगरपालिकेला वेगवेगळा कायदा आहे का. नाला, तलाव लगत नागरीकांच्या जीवीतास धोका आहे, ते त्वरीत स्थलांतर करावे. मग ते अधिकृत असो की अनधिकृत असो.

मा.सभापती : जीवित हानी होण्याची शक्यता आहे म्हणून कार्यवाहीचे आदेश दिले होते. पुढील बैठकीपर्यंत कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा.

कार्य.अभि.(पा.पु.) : पाईपची किंमत वगळून अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. स.सदस्य श्री.कावडे यांच्या प्रभागातील काम निविदा अंतर्गत आहे. निविदा अंतिम टप्प्यात आहे. निविदा मंजूर होताच आठ दिवसात सुरू करण्यात येईल.

श्री.साहेबराव कावडे : माझ्या वॉर्डात लाईट नाही. गणेशोत्सवाच्या कालावधीत लाईट लावणार की नोही.

मा. सभापती : गणेशोत्सवाच्या काळात लाईट लावण्यात येतील.

श्री. रविकांत गवळी : नदीतील अतिक्रमण एक काढले व एक काढले नाही. सिडकोतील खुल्या जागेतील अतिक्रमण, त्या खुल्या जागा हस्तांतर झालेल्या आहेत का.

मा. आयुक्त : त्यावर स्थगिती आदेश आहे, कोणत्या जागा आहे, सिडकोची खुल्या जागांची यादी सर्वांना वितरीत करण्यात येईल.

**ठराव :**

दिनांक 26/7/2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे (का.प.क्र.7 व 8) इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.66 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत पाण्याची गढुळता काढण्यासाठी

आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी अंदाजपत्रक महाराष्ट जीवन प्राधिकरणाची दरसुची 2004-05 नुसार रूपये 14,42,000/- चे तयार करण्यात आलेले असून, या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवणेसाठी दि.19.7.2006 अन्वये शिफारस केलेली आहे.

आर्थिक वर्ष 2006-07 च्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठा रसायने खरेदीकरीता तरतुद करण्यात आलेली आहे. करीता वर्ष 2006-07 मधील वार्षिक तुरटी खरेदीसाठी रूपये 14,42,000/- चे अंदाजपत्रक स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रीयेत पाण्याची गढुळता काढण्यासाठी आवश्यक असणारी तुरटी खरेदीसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.14,42,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.67 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरात विविध ठिकाणी डीआयके प्रकारचे पाईपचा वापर करून जलवाहिन्या टाकावयाच्या आहेत. त्यासाठीच्या विविध कामासाठी वेळोवेळी निविदा मागविण्यात आल्या होत्या. ती कामे खालील प्रमाणेची आहेत त्या कामाचा समावेश हा स्पील ओव्हर कामांच्या यादीत करण्यात आलेला आहे.

1. हरसिध्दी जलकुंभ ते मध्यवर्ती कारागृह लगतच्या जलकुंभा पर्यंत 250 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
2. नागेश्वरवाडी भोईवाडा भागात 100 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
3. आरेफ कॉलनी तीन देवी भागात 100 व 200 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
4. इंदिरानगर मेनरोड ते नुर मस्जीद पर्यंत 300 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
5. शरीफ कॉलनी येथे 200 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
6. वॉर्ड क्र.35 अंतर्गत अझीम कॉलनी, नारायणनगर भागात 150 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.
7. निझामगंज कॉलनी भागात 100 व 150 मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे.

उपरोक्त व इतर कामांसाठी निविदा विक्री झाल्या नाहीत तसेच काही कामांसाठी गुत्तेदारांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचे दर दिलेले होते. त्यांना दर कमी करण्यासाठी लेखी कळविले असता त्यांनी दर कमी केलेले नाहीत. त्यामुळे पुन्हा निविदा कार्यवाही करावी लागणार आहे. या कामावर निविदा मागविण्याचा खर्च पाहता तसेच कामाची तातडी पाहता कामे उपलब्ध गुत्तेदारातर्फे ज्यांना पाणी पुरवठा जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचे अनुभव आहे अशा गुत्तेदारांना कार्यालयातर्फे डीआयके प्रकारचे पाईप देण्यात येवून त्यांच्या तर्फे अंदाजपत्रकीय दरानुसार कामे करून घेण्यास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मधुकर सावंत : यामध्ये पाच-सात कामे दिलेली आहेत. माझ्या प्रभागातील कुशलनगर ते सौजन्यनगर भागात पाईपलाईन टाकण्यासंबंधी फाईल मंजूर होऊन तीन-चार महिने झाले. त्यात काही कार्यवाही झाली नाही. त्याचा यात समावेश करण्यात यावा.

मा. सभापती : सदर काम अंदाजपत्रकीय दराने या लिस्टमध्ये घेऊन करण्यात यावे. या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी डीआयके प्रकारचे पाईपचा वापर करून जलवाहिन्या टाकावयाच्या कामाची तातडी पाहता अशी कामे उपलब्ध गुत्तेदारातर्फे ज्यांना पाणी पुरवठा

जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचा अनुभव आहे अशा गुत्तेदारांना कार्यालयातर्फे डीआयके प्रकारचे पाईप देण्यात येवून त्यांच्या तर्फे अंदाजपत्रकीय दरानुसार कामे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.68 :</u>**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना, जायकवाडी ते बी.पी.टी. दरम्यान 1200 मीमी व्यासाची उध्दरणवाहिनीवर 1200 मीमी व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व पुरविणे, बसविणे चा प्रस्ताव सादर केला आहे. सदर कामाचा र.रू.12,13,100/- किंमतीचा प्रस्ताव मा.आयुक्तांचे मान्यतेनंतर मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात आला होता.

सदरचे कामामध्ये औरंगाबाद पाणी पुरवठा योजना अंतर्गत पिंपळवाडी बंड व टाकळीफाटा येथे 1200 मीमी व्यासाचे जुने बटरफ्लाय व्हॉल्व बदलून नविन बसविणे व अनुषंगीक बाबी अंतर्भूत आहेत. कारण सध्याचे व्हॉल्व नादुरूस्त आहेत व यामुळे जलवाहिनीवर काम निघाल्यास बी.पी.टी. ते जायकवाडी पर्यंत जी वाहिनी रिकामी करावी लागते ते टाळून सेक्शनिंगमुळे पाण्याचा अपव्यय होणार नाही व पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे व दैनंदिन देखभालीसाठी याचा उपयोग होणार आहे.

मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीनंतर सदर कामाच्या निविदा दि.10.2.2006 रोजी प्रसिध्द झाल्यावर, खालील निविदा धारकांचे देकार प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| 1. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 41% जास्त |
| 2. रेणुका इलेक्ट्रीक कं. | अं.प.दरापेक्षा 44% जास्त |
| 3. पॅटसन व्हॉल्व | अं.प.दरापेक्षा 45% जास्त |
| 4. एजाज अहमद | अं.प.दरापेक्षा 55% जास्त |
| 5. सेठ अँड सुरा | अं.प.दरापेक्षा 48% जास्त |

उपरोक्तपैकी मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे दर कमी असल्यामुळे त्यांना दर पृथ:करणासह वाटाघाटीस बोलावले असता, त्यांनी दर पृथ:करण सादर केले. पुनः आय.व्ही.सी. कंपनीला पत्र देऊन व्हॉल्व पुरविण्याचे सर्व करासह दर मागवून तुलनात्मकदृष्ट्या अभ्यास करता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांचे दरास मा.आयुक्तांनी 41% जास्तीच्या दरास मंजुरी देऊन वाढीव रक्कम रू.17,10,393/- किंमतीचे अंदाजपत्रकाच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | : मे.एल.के.कन्स्ट्रक्शनवर महानगरपालिकेने गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात मी पत्र दिले आहे की, त्यांना देता येते का म्हणून. निदोष सिध्द होत नाही तोपर्यंत काम देण्यात येऊ नये. |
| श्री.विनायक पांडे | : अंदाजपत्रकीय दरापेक्षा 41%, 44%, 45%, 48%, 55% जास्त दराने ठेकेदार कसे जातात. |
| कार्य.अभि.(पा.पु.) | : मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांच्या विषयी तक्रारीची माहिती आहे. काम देऊ नये याची सूचना नाही. |
| अति.शहर अभियंता | : मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांनी अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडील एका कामाच्या संदर्भात खोटी कागदपत्रे दाखल केले होते. |
| मा. सभापती | : मा.आयुक्तांनी खुलासा करावा. |

मा.आयुक्त : त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्राची सोलापुर पीडब्ल्युडी विभागाकडून माहिती घेतली असता सदर कागदपत्र खोटे असल्याचे दिसून आले. ज्यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात आले ते अस्तित्वात नाही. रद्द करावे पुन्हा ठेवण्यात येईल.

श्री.हिंमतराव दाभाडे : जोपर्यंत गुन्हा सिध्द होत नाही तोपर्यंत दोषी होऊ शकणार नाही. त्यामुळे या ठेकेदारास काम देण्यास हरकत नसावी.

मा. सभापती : सदर प्रस्तावाचे संदर्भात कायदेशीर बाबी तपासणे आवश्यक आहे असे वाटते. म्हणून कायदेशीर बाबी तपासून योग्य वाटल्यास हा प्रस्ताव पुन्हा स्थायी समिती समोर सादर करावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावाचे संदर्भात कायदेशीर बाबी तपासणे आवश्यक आहे असे वाटते. म्हणून कायदेशीर बाबी तपासून योग्य वाटल्यास हा प्रस्ताव पुन्हा स्थायी समिती समोर सादर करावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.69 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील बाजूने 50' विकास योजना वळण रस्ता तयार करणेच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 12,97,857/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर प्रकरणात दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील बाजूने काही नागरी वस्ती आहे. तसेच नियोजित रस्त्यामध्ये मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, महाराष्ट्र शासन यांच्या मालकीचीही जागा बाधीत होत आहे. सदर बाधीत जागेच्या भुसंपादनाची कार्यवाही करण्यासाठी वेगळे प्रकरण चालू आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे व मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केले आहे. तरी र.रू.12,97,857/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील बाजूने 50' विकास योजना वळण रस्ता तयार करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,97,857/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.70 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुतगिरणी चौक ते काबरानगर या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसुचीप्रमाणे र.रू.12,21,900/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा समावेश सन 2006-07 च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षकाखाली करण्यात आलेला असून त्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध आहे. तरी रू.12,21,900/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुतगिरणी चौक ते काबरानगर या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,21,900/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.71 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते यांचे डिफर्ड पेमेंट तसेच इतर धर्तीवर डांबरीकरण करण्यासाठी, श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नेमणूक करण्यासाठी दि.10.1.2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.171 नुसार मंजुरी दिलेली आहे व सदर ठराव हा शिफारशीसह मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला. दि.20.1.2006 रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून खालील दराने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| 1. निविदापुर्व काम जसे रस्त्याचे सर्वेक्षण करणे, डिझाईन करणे, कामाचे स्पेसिफिकेशन करणे, निविदा तयार करणे, देणे इत्यादी | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1% |
| 2. निविदा काढल्यानंतरची कामे | अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 1.5% |

उपरोक्त फिस व्यतिरिक्त चालू प्रचलित दराप्रमाणे सर्व्हीस टॅक्स द्यावा लागेल असे त्यांनी करारनाम्यात नमूद केलेले आहे. याप्रमाणे फिस देण्याबाबत मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे.

तरी P.M.C. ला उपरोक्त दराप्रमाणे नमूद फिस व्यतिरिक्त चालू प्रचलित दराप्रमाणे सर्व्हीस टॅक्स देय करण्याकरीता दुरूस्ती प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

अति.शहर अभियंता : सदर प्रस्ताव आयआरडीपी अंतर्गत डिफर्ड पेमेंट धर्तीवर मागील स्थायी समितीमध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून श्रीखंडे कन्सल्टंट यांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यावेळी अनवधानाने सर्व्हीस टॅक्स समावेश नव्हता. म्हणून स्थायी समिती समोर ठेवण्यात आलेला आहे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील काही मुख्य रस्ते तसेच महत्वाचे विकास योजना रस्ते यांचे डिफर्ड पेमेंट तसेच इतर धर्तीवर डांबरीकरण करण्यासाठी, नियुक्त करण्यात आलेली एजन्सी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC), श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि.मुंबई यांना प्रस्तावात दर्शविलेल्या फिस व्यतिरिक्त चालू प्रचलित दराप्रमाणे सर्व्हीस टॅक्स देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.72 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, पहाडसिंगपुरा स्वयंसिध्द सोसायटी लगत रस्त्याचे संरक्षित भिंतीच्या बांधकामासह खडीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.12,99,958/- चे असून या कामासाठी मा.स्थायी सति सभा दि.23.2.2006 ठराव क्र.232 अन्वये फेरनिविदा मागविण्याचे आदेशित केल्यानुसार फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकूण 14 कोरी निविदापत्रके विक्री झाली व त्यापैकी 6 निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

1. श्री. काझी एम. एम. — अं.प.दरापेक्षा 3.73% जास्त दराने
2. श्री. एस. एम. इब्राहीम — अं.प.दरापेक्षा 4.2% जास्त दराने
3. श्री.मोहम्मद रऊफ मो.युसुफ — अं.प.दरापेक्षा 5.8% जास्त दराने
4. श्री.एस. एम. शेख — अं.प.दरापेक्षा 6.5% जास्त दराने
5. मे. एल.के.कन्स्ट्रक्शन — अं.प.दरापेक्षा 6.9% जास्त दराने
6. श्री. एम. ए. सईद — अं.प.दरापेक्षा 7.67% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 3.73% जास्त दराची निविदा श्री. काझी एम.एम. यांची असून वाटाघाटीअंती गुत्तेदाराने मा.आयुक्त यांचे समक्ष सदर काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिलेली आहे व त्यास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे.

तरी श्री. एम.एम.काझी यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

अति.शहर अभियंता : फेरनिविदामुळे स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. मकबऱ्याच्या बाजुला आहे. आज तेथे रस्ता उपलब्ध नाही.

श्री.विनायक पांडे : गेल्या दहा वर्षापासून या संदर्भात अनेक निवेदने दिलेली आहेत. मंजूर करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पहाडसिंगपुरा स्वयंसिध्द सोसायटी लगत रस्त्याचे संरक्षित भिंतीच्या बांधकामासह खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.काझी एम.एम. यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.73 :</u>**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रायगडनगर प्र.क्र.19, एन-9 म्हाडा कॉलनी येथे उद्यान विकसित करण्याकरीता सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसुचीनुसार र.रू.10,48,650/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामास्तव निविदा सूचना क्र.मनपा/लेखा/नि/93/06 दि.4.2.2006 अन्वये निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प.दरापेक्षा 0.5786% कमी दराची निविदा श्री.एस.ए.नवाब यांची प्राप्त झाली होती. तथापी दराबाबतच्या वाटाघाटीअंती अं.प.दरापेक्षा 1% कमी दराने मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामास्तव सन 2006-07 या आर्थिक वर्षात "विकास योजने अंतर्गत भूखंडाचे संरक्षण" या लेखा शिर्षा अंतर्गत स्पील ओव्हर रक्कम रू.12.00 लक्षची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

सदरील कामामध्ये विविध कामांची वाढ झालेली असल्या कारणाने वाढीव कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.4,99,876/- चे तयार करण्यात आलेले आहे. तसेच सदरील वाढीव काम मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 1%कमी दराने मुळ निविदाधारक श्री.एस.ए.नवाब यांच्याकडून करून घेणेस्तव सादर केले असता मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.10,48,650/- + 4,99,876 असे एकूण 15,48,526/- तसेच वाढीव काम मुळ ठेकेदाराकडून मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 1% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

कार्य.अभि.(ड्रे.वि.इ.) : संबंधीत प्रभागाचे पालिका सदस्य यांच्या वॉर्डातील काम चालू होते. कामाचे ॲटम सारखेच होते. काम चालू असल्याने या कामात उर्वरीत काम करून द्यावे अशी मागणी होती. सी.डी. वर्क होते. त्यामुळे प्रस्तावित केले.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रायगडनगर प्र.क्र.19, एन-9 म्हाडा कॉलनी येथे उद्यान विकसित करण्याचे कामामध्ये विविध कामांची वाढ झालेली असल्याने वाढीव कामाचे सुधारीत अंदाजपत्रक एकूण र.रू.15,48,526/- ला तसेच सदरील वाढीव काम मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 1%कमी दराने मुळ निविदाधारक श्री.एस.ए.नवाब यांच्याकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.74 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट येथील मनपा कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरूस्ती करण्यासाठी सा.बां.विभागाच्या सन 2004-05 च्या जिल्हा दरसूचीनुसार र.रू.4,16,713/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा.आयुक्तांच्या मान्यतेनुसार निविदा सूचना जा.क्र.मनपा/लेखा/नि/87/06 दि.21.1.2006 अन्वये निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची निविदा मोना कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झाली होती. तथापी दराबाबतच्या वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.2% कमी दराने मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

उर्वरीत 10 निवासस्थानांची दुरूस्ती करणे बाबत मा.आयुक्तांनी आदेशीत केल्यानुसार वाढीव कामाचे अंदाजपत्रक र.रू.6,11,600/- चे तयार करण्यात आले व सदरील वाढीव काम मुळ गुत्तेदाराकडून मुळ दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 1.2% कमी दराने करून घेण्यास्तव सादर केले असता मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेस्तव शिफारस केलेली आहे. सदरील कामास्तव सन 2006-07 या आर्थिक वर्षाअंतर्गत मा.आयुक्तांचे निवासस्थानाकरीता ठेवण्यात आलेल्या तरतुदीतून सदरील वाढीव काम हाती घेण्यात येत आहे.

त्यानुसार सदरील कामांचे वाढीव अंदाजपत्रक र.रू.6,11,600/- चे वाढीव काम मुळे ठेकेदाराकडून मुळ मंजुर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 1.2% कमी दराने करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेट येथील मनपा कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची दुरूस्ती करण्याचे कामामध्ये उर्वरीत 10 निवासस्थानांची दुरूस्ती करण्याचे रू.6,11,600/-चे वाढीव काम या कामाचे मुळ गुत्तेदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांचेकडून मुळ मंजूर दरानुसार म्हणजेच अं.प.दरापेक्षा 1.2% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.75 :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालयास, मलेरीया विभागास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.18-6-2006 नुसार दै.लोकमत, सामना, सकाळ या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.19-6-2006 ते 26-6-2006 या कालावधीत एकूण आठ निविदा विक्री झाल्या व दि.30-6-2006 रोजी एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. एकूण चार निविदा धारकांनी दिलेल्या दरानुसार सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जोडलेला आहे. खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर त्या-त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांक

नमूद केलेले आहेत. त्याचप्रमाणे सन 2005-06 या वर्षासाठीचे मान्य दराचा उल्लेख तुलनात्मक दराच्या तक्त्यात नमूद केलेला आहे.

प्राप्त कमी दर हे अत्यंत स्पर्धात्मक दर आहेत. त्याचप्रमाणे बाजारातील दरापेक्षा सरासरी कमी दर असून एकूण 58 ॲटमपैकी 15 ॲटममध्ये थोड्याफार प्रमाणात गतवर्षीच्या मान्य दरापेक्षा जास्त दर असून त्यामुळे अंदाजे रू.10,000/- जास्तीचा खर्च अपेक्षीत आहे. खालील प्रमाणे निविदाधारकाचे नाव व त्यासमोर त्या-त्या निविदाधारकाने भरलेल्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे एकूण ॲटमचा उल्लेख केला आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | 08 | 6, 13, 14, 23, 43, 54, 57 व 58. |
| 2 | इन्शा ट्रेडींग | 28 | 1, 2, 4, 5, 12 ते 14, 19, 23, 25, 26, 28 ते 37, 40 ते 42, 44 ते 46 व 51. |
| 3 | कनकलता महिला सेवाभावी संस्था | 19 | 3, 7, 8, 13 ते 17, 20 ते 22, 27, 35, 43, 49, 50, 55 व 56. |
| 4 | न्यु भारत स्टोअर्स | 14 | 10, 11, 16, 18, 20, 22, 38, 39, 47 ते 49, 51 ते 53. |

उपरोक्त ॲटमपैकी एकूण 5 ॲटममध्ये दोन निविदाधारकांचे दर समान आहेत तर दोन ॲटममध्ये तीन निविदाधारकांचे दर समान आहेत. एकूण अंदाजित खरेदीसाठी 9.5 लक्ष रूपये एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यासाठ 30 लक्ष रूपये अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात आली आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालयास, मलेरीया विभागास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर दर्शविल्यानुसार तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांकाचे दांराना तसेच सदरील काम संबंधीत पुरवठाधारकाकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | रोशन सेल्स कॉर्पोरेशन | 08 | 6, 13, 14, 23, 43, 54, 57 व 58. |
| 2 | इन्शा ट्रेडींग | 28 | 1, 2, 4, 5, 12 ते 14, 19, 23, 25, 26, 28 ते 37, 40 ते 42, 44 ते 46 व 51. |
| 3 | कनकलता महिला सेवाभावी संस्था | 19 | 3, 7, 8, 13 ते 17, 20 ते 22, 27, 35, 43, 49, 50, 55 व 56. |
| 4 | न्यु भारत स्टोअर्स | 14 | 10, 11, 16, 18, 20, 22, 38, 39, 47 ते 49, 51 ते 53. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.76 :</u>**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे लेखन व ड्रॉइंग साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.18-6-2006 नुसार दै.लोकमत, सामना, सकाळ या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.19-6-2006 ते 26-6-2006 या कालावधीत एकूण बारा निविदा विक्री झाल्या व दि.30-6-2006 रोजी एकूण नऊ निविदा प्राप्त झाल्या. एकूण नऊ निविदा धारकांनी दिलेल्या दरानुसार सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जोडलेला आहे. खालील तत्क्यात

दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर त्या-त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे ॲटम क्रमांक नमूद केलेले आहेत. त्याचप्रमाणे सन 2005-06 या वर्षासाठीचे मान्य दराचा उल्लेख तुलनात्मक दराच्या तक्त्यात नमूद केलेला आहे.

प्राप्त कमी दर हे अत्यंत स्पर्धात्मक दर आहेत. त्याचप्रमाणे बाजारातील दरापेक्षा सरासरी कमी दर असून एकूण 99 ॲटमपैकी 33 ॲटममध्ये थोड्याफार प्रमाणात गतवर्षीच्या मान्य दरापेक्षा जास्त दर असून त्यामुळे अंदाजे रू.30,000/- जास्तीचा खर्च अपेक्षीत आहे. खालील प्रमाणे निविदाधारकाचे नाव व त्यासमोर त्या-त्या निविदाधारकाने भरलेल्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे एकूण ॲटमचा उल्लेख केला आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | कनकलता महिला सेवाभावी संस्था | 12 | 4, 6, 7, 17, 35, 56, 60, 62, 82, 89, 91 व 97. |
| 2 | पेपर फिल्ड | 03 | 73, 74 व 75. |
| 3 | डी. के. स्टेशनर्स | 02 | 25, 45. |
| 4 | आर. एल. दौलताबादकर | निरंक | निरंक |
| 5 | न्यु भारत स्टोअर्स | 41 | 1 ते 3, 5, 10, 11, 13, 14, 26 ते 30, 32, 33, 36, 38 ते 40, 42, 44, 50, 54, 61, 63, 64, 66 ते 69, 71, 72, 76, 77, 85, 87, 88, 91, 92, 94 व 96. |
| 6 | महेश इन्टरप्राईजेस | 03 | 47, 65 व 91. |
| 7 | अभय ट्रेडर्स | 14 | 10, 20, 21, 46, 48, 51, 57, 83, 87, 90, 93, 96, 98 व 99. |
| 8 | ओके ट्रेडर्स | 05 | 31, 34, 37, 81 व 86. |
| 9 | विजय जनरल स्टोअर्स | 26 | 8, 9, 12, 15, 16, 18, 19, 22 ते 24, 33, 41, 43, 48, 49, 52, 53, 55, 58, 59, 70, 78 ते 80, 84 व 95. |

उपरोक्त ॲटमपैकी एकूण 4 ॲटममध्ये दोन निविदाधारकांचे दर समान आहेत तर 01 ॲटममध्ये तीन निविदाधारकांचे दर समान आहेत. एकूण अंदाजित खरेदीसाठी 13 लक्ष रूपये एवढा खर्च अपेक्षित आहे. त्यासाठी 20 लक्ष रूपये अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात आली आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे लेखन व ड्रॉइंग साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर दर्शविल्यानुसार तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांकाचे दांराना तसेच सदरील काम संबंधीत पुरवठाधारकाकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | कनकलता महिला सेवाभावी संस्था | 12 | 4, 6, 7, 17, 35, 56, 60, 62, 82, 89, 91 व 97. |
| 2 | पेपर फिल्ड | 03 | 73, 74 व 75. |
| 3 | डी. के. स्टेशनर्स | 02 | 25, 45. |
| 4 | आर. एल. दौलताबादकर | निरंक | निरंक |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | न्यु भारत स्टोअर्स | 41 | 1 ते 3, 5, 10, 11, 13, 14, 26 ते 30, 32, 33, 36, 38 ते 40, 42, 44, 50, 54, 61, 63, 64, 66 ते 69, 71, 72, 76, 77, 85, 87, 88, 91, 92, 94 व 96. |
| 6 | महेश इन्टरप्राईजेस | 03 | 47, 65 व 91. |
| 7 | अभय ट्रेडर्स | 14 | 10, 20, 21, 46, 48, 51, 57, 83, 87, 90, 93, 96, 98 व 99. |
| 8 | ओके ट्रेडर्स | 05 | 31, 34, 37, 81 व 86. |
| 9 | विजय जनरल स्टोअर्स | 26 | 8, 9, 12, 15, 16, 18, 19, 22 ते 24, 33, 41, 43, 48, 49, 52, 53, 55, 58, 59, 70, 78 ते 80, 84 व 95. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.77 :</u>**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.18-6-2006 नुसार दै.लोकमत, सामना, सकाळ या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.19-6-2006 ते 26-6-2006 या कालावधीत एकूण बारा निविदा विक्री झाल्या व दि.30-6-2006 रोजी एकूण सात निविदा प्राप्त झाल्या. एकूण सात निविदा धारकांनी दिलेल्या दरानुसार सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जोडलेला आहे. खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर त्या-त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे ॲटम क्रमांक नमूद केलेले आहेत. त्याचप्रमाणे सन 2005-06 या वर्षासाठीचे मान्य दराचा उल्लेख तुलनात्मक दराच्या तक्त्यात नमूद केलेला आहे.

प्राप्त कमी दर हे अत्यंत स्पर्धात्मक दर आहेत. त्याचप्रमाणे बाजारातील दरापेक्षा सरासरी कमी दर असून एकूण 161 ॲटमपैकी 29ॲटममध्ये थोड्याफार प्रमाणात गतवर्षीच्या मान्य दरापेक्षा जास्त दर असून त्यामुळे अंदाजे रू.35,000/- जास्तीचा खर्च अपेक्षीत आहे. खालील प्रमाणे निविदाधारकाचे नाव व त्यासमोर त्या-त्या निविदाधारकाने भरलेल्या तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे एकूण ॲटमचा उल्लेख केला आहे.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | रोहन प्रिंटर्स | 02 | 105 व 107. |
| 2 | मिनाक्षी प्रिंटर्स | 18 | 4, 13, 18, 28, 46, 50, 55 ते 58, 65, 83, 115, 116, 118, 125, 150/3-अ व 150/4-अ. |
| 3 | राका प्रिंटर्स | निरंक | निरंक |
| 4 | लिबर्टी प्रिंटर्स | 46 | 2, 5, 6, 31, 33, 44, 62, 65, 70 ते 73, 75, 76, 79, 85 ते 90, 98 ते 104, 106, 108 ते 110, 114, 117, 119, 122, 124, 128 ते 132, 150/3-ब, 150/3-क, 150/4-ब, व 150/4-क. |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | प्रविण प्रिंटर्स | निरंक | निरंक |
| 6 | अभय ट्रेडर्स | 79 | 3, 8 ते 12, 14 ते 16, 19 ते 27, 29, 30, 32, 34 ते 45, 47 ते 49, 51 ते 54, 59 ते 61, 63, 64, 66 ते 69, 74, 77, 78, 80 ते 82, 84, 91 ते 97, 111 ते 113, 120, 121, 126, 127, 133 ते 136, 138, 141 ते 144 व 148. |
| 7 | जयभारती इक्सरसाईज बुक | 18 | 1, 7, 17, 123, 137, 139, 140, 145 ते 147, 149, 150/1-अ, ब, क, 150/2-अ, ब, क. |

उपरोक्त ॲटमपैकी एकूण 1 ॲटममध्ये दोन निविदाधारकांचे दर समान आहेत. एकूण अंदाजित खरेदी जकात विभागासाठी 6.5 लक्ष रूपये, शिक्षण विभागासाठी 4.5 लक्ष रूपये तर सर्वसाधारण छपाईसाठी अंदाजे 7 लक्ष रूपये एवढा खर्च अपेक्षीत आहे. त्यासाठी 25 लक्ष रूपये अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात आली आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन 2006-07 या वर्षासाठी लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी खालील तत्क्यात दर्शविल्याप्रमाणे पुरवठाधारकांचे नांवासमोर दर्शविल्यानुसार तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम क्रमांकाचे दांराना तसेच सदरील काम संबंधीत पुरवठाधारकाकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नांव | एकूण ॲटम | ॲटम क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | रोहन प्रिंटर्स | 02 | 105 व 107. |
| 2 | मिनाक्षी प्रिंटर्स | 18 | 4, 13, 18, 28, 46, 50, 55 ते 58, 65, 83, 115, 116, 118, 125, 150/3-अ व 150/4-अ. |
| 3 | राका प्रिंटर्स | निरंक | निरंक |
| 4 | लिबर्टी प्रिंटर्स | 46 | 2, 5, 6, 31, 33, 44, 62, 65, 70 ते 73, 75, 76, 79, 85 ते 90, 98 ते 104, 106, 108 ते 110, 114, 117, 119, 122, 124, 128 ते 132, 150/3-ब, 150/3-क, 150/4-ब, व 150/4-क. |
| 5 | प्रविण प्रिंटर्स | निरंक | निरंक |
| 6 | अभय ट्रेडर्स | 79 | 3, 8 ते 12, 14 ते 16, 19 ते 27, 29, 30, 32, 34 ते 45, 47 ते 49, 51 ते 54, 59 ते 61, 63, 64, 66 ते 69, 74, 77, 78, 80 ते 82, 84, 91 ते 97, 111 ते 113, 120, 121, 126, 127, 133 ते 136, 138, 141 ते 144 व 148. |
| 7 | जयभारती इक्सरसाईज बुक | 18 | 1, 7, 17, 123, 137, 139, 140, 145 ते 147, 149, 150/1-अ, ब, क, 150/2-अ, ब, क. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.78 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, दमडीमहल येथे 100' रूंद विकास योजना रस्त्यावर पुल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.79,00,000/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 6 निविदा विक्री झाल्या व दर भरलेल्या एकूण 5 निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री. ए.सी. शेख | अं.प.दरापेक्षा 13.76% कमी दराने |
| 2. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 9.786% कमी दराने |
| 3. मे. अन्सारी कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 8.01% कमी दराने |
| 4. मे. राणा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 7.787% कमी दराने |
| 5. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा 4.21% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री. ए.सी. शेख यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.76% कमी दराने आहे. सदर निविदेस मा.आयुक्तांनी शिफारस करून मा.स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सद्य:स्थितीत भूसंपादन करण्याची वेगळी समांतर कार्यवाही चालू आहे.

तरी श्री.ए.सी. शेख यांची अं.प.दरापेक्षा 13.76% कमी दराची निविदा मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.रविकांत गवळी | : कोणत्या हेडमधून खर्च करणार. |
| श्री.संजय शिरसाट | : सदर काम करण्यास हरकत नाही. परंतु भूसंपादनाची वेगळी कार्यवाही चालू आहे असे प्रस्तावात नमूद आहे. |
| श्री.मुजीब खान | : या कामासाठी भूसंपादनाची गरज नाही. सरकारी इमारती आहेत. |
| अति.शहर अभियंता | : दमडी महल येथे 100 फुट रस्त्यावर हा पुल बांधावयाचा आहे. ऐतिहासिक दमडी महल आहे. दोन्ही बाजूला शासनाची जागा आहे. महानगरपालिकेला लवकर मिळणार आहे. मा.विभागीय आयुक्तांसह चर्चा झाली. वास्तुच्या मागच्या बाजुला दर्गा आहे. काही जागा संपादन करावी लागेल. |
| श्री.संजय शिरसाट | : भूसंपादनाची कार्यवाही समांतर चालू आहे. कशाच्या आधारावर सांगण्यात येते. ही जबाबदारी अतिरिक्त शहर अभियंता यांची नाही. |
| श्री.मुजीब खान | : जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाजुने रविंद्रनगर, चंपा मस्जीद मार्गे पुढे सिंचन भवनकडे हा रस्ता जातो. हा रस्ता तयार करण्यासाठी 1988 पासून कार्यवाही करण्यात येत आहे. पुरातत्व विभागाच ना हरकत प्रमाणपत्र त्यावेळी मिळाले नव्हते. मा.विभागीय आयुक्तांची भेट घेतली, मान्यता मिळाली. दर्गाची जमीन ही बाजुला आहे. या भागात खाजगी जमीनी नाही. गायके, रविंद्रनगर इ. ले-आऊट आहेत. |
| श्री. रविकांत गवळी | : भूसंपादनाची कार्यवाही चालू आहे, भूसंपादन झाल्यावर ठेवावे. |
| सौ.लता दलाल | : या ठिकाणी आरोप करण्यात येतो, हा प्रस्ताव कसा सादर झाला. अतिरिक्त शहर अभियंता यांना भूसंपादनाचा अधिकार आहे का? तूर्त स्थगित ठेवावा. पूर्ण माहितीसह पुढच्या सभेत विस्ताराने ठेवावा. |
| श्री.मुजीब खान | : अधिकारी स.सदस्यामध्ये फुट पाडण्याची कामे करतात. जाणूनबुजून विशिष्ट भागातील कामे करीत नाहीत. |
| मा. सभापती | : सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.79 :**

1. सौ. चित्रा श्रीनिवासराव गंभीर, यांनी दि.13.8.2003 रोजी अर्ज देवून सेवा 20 वर्षे झाली आहे, त्यामुळे स्वेच्छा निवृत्ती द्यावी व नियमाप्रमाणे देय असलेली रक्कम अदा करणे बाबत विनंती केली होती.

2. श्रीमती चित्रा गंभीर यांची नियुक्ती कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/5928/83 दि.5.8.83 अन्वये कनिष्ठ लिपीकर्ि म्हणून झाली होती व त्या दि.6.8.83 पासून मनपा सेवेत रूजू झाल्या.

3. सन 1983 ते दि.12-12-1996 पर्यंत 13 वर्षे नियमित सेवा केली. दि.13-11-96 ते दि.12-12-96 पर्यंत (30) दिवस अर्जित रजा, दि.13-12-96 ते दि.23-12-96 (11) दिवस परावर्तीत रजा मंजूर करण्यात आली.

4. दि.24-12-96 ते दि.24-11-97 पर्यंत गैरहजर होया व 11 महिने 02 दिवस विनापगारी रजा मंजूर करणेबाबत दि.24-9-97 ला अर्ज केला. कार्यालयाने रजा मंजूर केली नाही, तेव्हापासून त्या सतत गैरहजर आहेत.

5. म्हणजे दि.24-12-96 ते 13-8-2003 पर्यंत एकूण गैरहजर कालावधी 06 वर्षे 7 महिने 21 दिवसानंतर सदरील कर्मचाऱ्याने माझी सेवा 20 वर्षे झाली आहे, त्यामुळे मी स्वेच्छा सेवानिवृत्ती घेत आहे व नियमानुसार देय रक्कम देण्यात यावी म्हणून विनंती अर्ज केला.

6. सौ.चित्रा श्रीनिवासराव गंभीर, ह्या अर्जित रजेवर जाण्यापुर्वी लेखा विभागात कार्यरत होत्या.

7. सन 1996 ते 2003 पर्यंत सदरील कर्मचारी अनुपस्थित राहूनही कार्यालयातर्फे या 7 वर्षाच्या कालावधीत काहीच कार्यवाही न झाल्यामुळे सर्व जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत मा.आयुक्त महोदयांनी दि.6-12-2003 रोजी आदेशित केले आहे.

8. सदरील कर्मचारी 13 वर्षाची सेवा झाल्यानंतर सतत 07 वर्षे गैरहजर राहिल्या, 20 वर्षाच्या कालावधीनंतर सदर कर्मचाऱ्यानी निवृत्तीवेतन नियम 1982 चे कलम 66 (1) नुसार 20 वर्षाची अर्हताकारी सेवा झाल्यानंतर मिळणाऱ्या सवलतीनुसार स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी अर्ज सादर केला.

9. सदरील कर्मचाऱ्यांची अखंड सेवा फक्त 13 वर्षे आहे व त्या 7 वर्षे ससवत विनापरवानगी गैरहजर राहिल्या आहेत. त्यामुळे कलम 66(1) नुसार 20 वर्षाच्या सेवेचा लाभ संबंधितास देय होणार नाही.

10. सदर 07 वर्षाच्या गैरहजेरीबाबत दि.7-1-2004 च्या पत्रानुसार कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदरील नोटीसच्या उत्तरी त्यांनी आपली घरगुती कारणे दाखवली आहेत. यात त्यांनी पतीची तब्येब ठिक नव्हती, सासुबाईंना मुत्रपिंडाचा आजार झाला, सासऱ्यांना मधुमेह झाला, त्यातच दोघांचे निधन झाले.

11. उक्त खुलासा समाधानकारक नसल्यामुळे संबंधितांना दि.3-3-2004 अन्वये पुन्हा कारणे दाखवा नोटीस देण्यात आली, त्यात त्यांनी दि.13-8-2003 पासून स्वेच्छा सेवानिवृत्ती मान्य करावी व नियमाप्रमाणे देय रक्कम अदा करावी, सेवानिवृत्तीचे फायदे नियमानुसार देय नसल्यास ते देण्यात येवू नये, अशी विनंती केली आहे.

12. परिच्छेद क्र.10, 11 मध्ये कारणे दाखवा नोटीसच्या खुलाशामध्ये सौ.चित्रा गंभीर, यांची 07 वर्षाचा अनुपस्थित कालावधी महाराष्ट्र नागरी सेपवा (रजा) नियम 1981 चे कलम 16 नुसार क्षमापित करता येणार नाही, कोणत्याही अपवादात्मक परिस्थितीत कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्यास 05 वर्षाहून अधिक कालावधीसाठी कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही.

13. दि.23-12-96 पर्यंत त्यांची परावर्तीत रजा मंजूर आहे. त्यानंतर त्या सतत आजपर्यंत बुध्दीपुरस्सर कामावर अनुपस्थित आहेत, त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 चे कलम 48(2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र आहेत.

14. परिच्छेद 3, 4 चे अवलोकन केले असता स्पष्ट होईल की, दि.24-12-96 पासून सौ.चित्रा गंभीर ह्या बुध्दीपुरस्सर विनापरवानगी गैरहजर राहिल्या व दि.13-8-2003 रोजी सेवेची 20 वर्षे होताच स्वेच्छा

सेवानिवृत्ती मिळणेबाबत विनंती अर्ज केला. यावरून स्पष्ट होते की, संबंधितांना नोकरीची गरज नव्हती केवळ सेवा 20 वर्षे होईपर्यंत त्यांना थांबावयाचे होते. त्यासाठी त्या सतत विनापरवानगी 7 वर्षे अनुपस्थित राहिल्या.

15.परिच्छेद क्र.12, 13, 14 चे अवलोकन केले असता श्रीमती चित्रा गंभीर, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 चे कलम 16, 48(2) चा भंग केला आहे. त्याअर्थी त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(3) अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून खुलासा करणे बाबत वाजवी संधी देण्यात आली. संबंधीताचा खुलासा असमाधानकारक असल्यामुळे सौ.चित्रा गंभीर, कनिष्ठ लिपीक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2)(ह) अन्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रीमती चित्रा गंभीर, कनिष्ठ लिपिक या विना परवानगी सतत 07 वर्षे गैरहजर असल्यामुळे, त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 चे कलम 16, 48(2) चा भंग केला असल्याने, श्रीमती चित्रा गंभीर, कनिष्ठ लिपिक यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2)(ह) अन्वये महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.80 :** **(दि.26-7-2006 रोजीच्या स्था.स.सभेतील स्थगित ठेवलेला प्रस्ताव क्र. 62)**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करून घेणेसाठी मुंबई येथील शिल्पकार 1) उत्तम पाचारणे, 2) इंद्रजीत यादव यांच्याशी दुरध्वनीवरून पुर्णाकृती पुतळा ब्राँझ धातुमध्ये तयार करणे बाबत दरपत्रक मागविले असता त्यापैकी श्री.उत्तम पाचारणे यांनी दरपत्रक पाठविले परंतु श्री.इंद्रजीत यादव यांनी प्रतिसाद दिलेला नाही. सदर 9 फुट उंच ब्राँझ धातूचा पुतळा तयार करणे करीता श्री.उत्तम पाचारणे यांनी रक्कम रू.8,50,000/- असा दर दिलेला आहे. पुतळयासाठी लागणाऱ्या चबुतऱ्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.2,50,000/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-2007 या आर्थिक वर्षात एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या शासकीय अनुदान रक्कम रू.10,00,000/- व महानगरपालिकेतर्फे रक्कम रू.1,00,000/- मधून करण्यात येत आहे.

श्री.उत्तम पाचारणे, शिल्पकार, मुंबई यांच्याकडून सदर पुतळा रक्कम रू.8,50,000/- मध्ये करण्यास मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली असून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव पाठविण्याचे आदेशित केलेले आहे. तरी एकूण अंदाजपत्रक रक्कम रू.11,00,000/- चे व पुतळ्याचे काम श्री.उत्तम पाचारणे, शिल्पकार, मुंबई यांचेकडून करून घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकात्मिक मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण कै.गोविंदभाई श्रॉफ यांचा पुर्णाकृती पुतळा तयार करून घेण्यासाठी एकूण अंदाजपत्रक रक्कम रू.11,00,000/- चे अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते तसेच सदरील पुतळ्याचे व चबुतऱ्याचे काम श्री.उत्तम पाचारणे, शिल्पकार, मुंबई यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.81 :**

शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनाचे जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेकडून शहर विकास आराखडा

(CFP) साठी 2025 दृष्टीक्षेपातील औरंगाबाद (Aurangabad Vision-2025) प्रकल्प विकास आराखडा तयार करण्यात आला असून सर्वसाधारण सभा दि.20.1.2006 ठराव क्र.156/2 अन्वये मंजुरी झालेली आहे.

केंद्र शासनाचे लहान व मध्यम शहराच्या नागरी पायाभूत सुविधांचा विकास (U.I.D.S.S.M.T.) या केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत देखील महानगरपालिकेस अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे, त्यासाठी आवश्यक असलेली बाब म्हणजे शहर विकास आराखडा (CDP) तयार करून मनपाची वर प्रस्तावित केल्याप्रमाणे मंजुरी झालेली असून दि.20.1.2006 च्या प्रस्तावात केंद्र शासनाकडून खालील पाच प्रकल्पासाठी अनुदान उपलब्ध करून घेण्यासाठी मंजूर झालेली आहे.

1. पाणी पुरवठा-समांतर जलवाहिनी, वितरण व्यवस्था सुधारणा व मजबुतीकरण.
2. जलनि:सारण प्रकल्प
3. घनकचरा व्यवस्थापन
4. शहर बस वाहतुक
5. झोपडपट्टी विकास अंतर्गत एक हजार घरे बांधणे.

सदर अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव पाठवितांना या योजनेत विशद करण्यात आलेल्या बाबीनुसार सविस्तर विकास प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून राज्य शासनामार्फत केंद्र शासनास पाठवावयाचा आहे.

सदर सविस्तर प्रकल्प अहवाला सोबत आवश्यक ते नकाशे, योग्य प्रकारे मांडणी, राज्य शासनाकडे व केंद्र शासनाकडे सादरीकरण करणे, वेळोवेळी उणीवा निघाल्यास त्याची पूर्तता करून देणे व केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्यासाठी प्रयत्न करणे या सर्व बाबींसाठी तज्ज्ञ व माहितगार एजन्सीकडून काम करून घेणे आवश्यक आहे. या कामासाठी फोर्ट्रेस इन्फास्ट्रक्चर ॲडव्हायजरी सर्व्हीसेस या संस्थेकडून केंद्र शासनाच्या सदरील योजने अंतर्गत जी मार्गदर्शक तत्वे आहेत, त्यास अनुसरून खालील कामे अद्ययावत करून घेणे प्रस्तावित आहे.

1. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियान लहान व मध्यम शहराच्या नागरी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी अद्यावत विकास आराखडा तयार करणे.
2. समांतर जलवाहिनीसाठी केंद्र शासनाकडून अनुदान मिळणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे.
3. झेपडपट्टींच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळणेकरीता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे.

सदरची कामे ही व्यवहारीक तत्वावर करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून मनपास भरीव अर्थसहाय्य उपलब्ध होईल. फोर्ट्रेस इन्फास्ट्रक्चर ॲडव्हायजरी सर्व्हीसेस ही संस्था एक अनुभवी संस्था असून त्यांनी ही कामे करून देण्यास संमती देवून या संपूर्ण कामासाठी रू.9,87,712/-(नऊ लक्ष सत्त्याऐंशी हजार सातशे बारा फक्त) कामाचा मोबदला मागणी केलेला आहे व त्याची देयक अदाई खालील टप्प्याप्रमाणे प्रस्तावित आहे.

1. कामाचे कार्यादेशानंतर 25%
2. प्रत्येक प्रारूप विकास प्रकल्पासाठी 10-10% (समांतर जलवाहिनी व झोपडपट्टी विकास प्रकल्प)
3. अंतिम विकास प्रकल्प अहवालाच्या वेळी 10-10%
4. प्रारूप शहर विकास योजनेच्या वेळी 20% व अंतिम आराखड्याच्या वेळेस 15%

करीा वरील कामे फोर्ट्रेस इन्फास्ट्रक्चर ॲडव्हायजरी सर्व्हीसेस यांचेकडून करून घेणेस प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाचे जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूज्जीवन अभियान अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेकडून शहर विकास आराखडा (CFP) साठी 2025 दृष्टीक्षेपातील

औरंगाबाद (Aurangabad Vision-2025) प्रकल्प विकास आराखडा सादर केल्यानुसार केंद्र शासनाचे लहान व मध्यम शहराच्या नागरी पायाभूत सुविधांचा विकास (U.I.D.S.S.M.T.) या केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत महानगरपालिकेस अर्थसहाय्य उपलब्ध करून घेण्याकरीता सविस्तर प्रकल्प अहवाला सोबत आवश्यक ते नकाशे, योग्य प्रकारे मांडणी, राज्य शासनाकडे व केंद्र शासनाकडे सादरीकरण करणे, वेळोवेळी उणीवा निघाल्यास त्याची पूर्तता करून देणे व केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळण्यासाठी प्रयत्न करणे या सर्व बाबींसाठी फोर्ट्रेस इन्फास्ट्रक्चर अॅडव्हायजरी सर्व्हीसेस या संस्थेकडून प्रस्तावात दर्शविलेली सर्व कामे करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.82 :**

शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे घनकचरा निर्मुलन व्यवस्थापनासाठी सन 2000 च्या नियमावली प्रमाणे बांधा वापरा आणि हस्तांतरण (BOT) तत्वावर निविदा मागविण्यात आल्या असून या प्रकल्पा संदर्भात व निविदे संदर्भात तांत्रिक सल्ला घेणेसाठी महाराष्ट्र प्रदुषण व नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव श्री.डी.बी.बोराळकर यांचेसह बैठक झाली असून त्यांनी या संदर्भात पत्र देवून कळविले आहे की, या सर्व कामासाठी सुमारे 30 लक्ष खर्च अपेक्षित असून त्यापैकी रू.20 लक्ष अग्रीम देणे बाबत कळविले आहे.

महाराष्ट्र प्रदुषण व नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव व आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे झालेल्या चर्चेअंती घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रकल्पासाठी प्रक्रीयेच्या अंदाजित रक्कमेच्या 1% एवढी रक्कम किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा जास्तीत जास्त 20 लाख रूपये इतकी रक्कम महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना अदा करणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा. आयुक्त : सध्या आपण कचरा मांडकी येथे टाकतो. त्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रीया करीत नाही. बीओटी तत्वावर सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतर निविदा काढण्यात आल्या. विविध तांत्रिक प्रस्ताव आले. त्याची तांत्रिक तपासणीसाठी आपल्याकडे सोय उपलब्ध नाही. महाराष्ट्र प्रदुषण व नियंत्रण मंडळ यांचे ना हरकत प्रमाणपत्र लागते. प्रदुषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव यांचेसोबत चर्चा झाली. साधारणपणे ते फीस घेत नाही. तांत्रिक कामाचे मुल्यमापन करणे, त्याचे सादरीकरण करणे, तपासणी करणे प्रत्यक्ष खर्च सुमारे 30 लाख येईल. प्रस्तावित केल्याप्रमाणे तीन्हीपैकी जे कमी येईल ते 20 लाख प्रस्तावित आहे. ते 1% पेक्षा कमी येईल. या कामासाठी प्रक्रीया, चाचणी, तपासणी यासाठी प्रत्यक्ष टीम पाठवावी लागेल. प्रस्तावित केल्याप्रमाणे तीनपैकी सर्वात कमी महाराष्ट्र प्रदुषण व नियंत्रण मंडळाला आपण देऊ. निविदा मागवायच्या आहेत. आपणास तांत्रिकदृष्ट्या सर्व बाबींचे मुल्यमापन करणे शक्य होणार नाही. मंजुरी देण्यात यावी.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे घनकचरा निर्मुलन व्यवस्थापनासाठी मागविण्यात आलेल्या निविदे संदर्भात तांत्रिक सल्ला घेणेसाठी, घनकचरा निर्मुलन व्यवस्थापन प्रकल्पासाठी प्रक्रीयेच्या अंदाजित रक्कमेच्या 1% एवढी रक्कम किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा जास्तीत जास्त 20 लाख रूपये इतकी रक्कम महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांना अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.83 :**

(दि.28.6.2006 रोजी च्या सभेतील विषय क्र.33 पुढील सभेत ठेवण्याच्या निर्णयानुसार महागाई भत्त्यासंबंधीचा प्रस्ताव पुन्हा सादर. प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.)

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/ ११०६/प्र.क्र.५/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.९ मे २००६ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि.१ मे २००६ महागाई भत्ता वाढ ३% मंजूर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.५.२००६ पासून महागाई भत्ता २१% ऐवजी २४% अदा करण्यासाठी प्रती माह रू.७.८३ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना मे २००६ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात २१% ऐवजी २४% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

सौ.लता दलाल : आस्थापना खर्च किती टक्के आहे, व शासनाच्या नियमाप्रमाणे किती असावयास पाहिजे.

लेखाधिकारी : 3% महागाई भत्ता वाढ प्रस्तावित आहे. महानगरपालिका आस्थापना खर्चासाठी अर्थसंकल्पात तरतुद केली आहे. आस्थापना खर्च 35% च्या वर जाणार नाही.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 1-5-2006 पासून 21% ऐवजी 24% महागाई भत्ता अदा करण्यास, तसेच माहे मे ते जुलै या तीन महिन्याची थकबाकी व ऑगस्ट 2006 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात वाढीव महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद